**ठाणे महानगरपालिका, ठाणे**
**शहर विकास विभाग**
**जाहिर सुचना**
**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये**

जा. क्र.ठामपा/शविवि/वियोअंक/१०८२ दिनांक ३१ /०७ /२०१८

ज्याअर्थी, ठाणे शहराची सुधारित विकास योजना शासन निर्णय क्र. टिपीएस-१२९७//१३१९/ सीआर-१४८/९७/नवि-१२, दि. ४ ऑक्टोबर, १९९९ अन्वये मंजूर असून, दि. २२ नोव्हेंबर, १९९९ पासून अंमलात आली. तसेच सुधारित विकास योजनेतील वगळलेले क्षेत्र (Excluded portion EP) शासन निर्णय क्र. टिपीएस-१२०१/२७४/सीआर-२८/२००९/नवि-१२, दि. ३ एप्रिल, २००३ अन्वये मंजूर असून, दि. १४ मे, २००३ पासून अंमलात आली आहे. (यापुढे "उक्त मंजूर विकास योजना" असे संबोधिले आहे)

ज्या अर्थी, ठाणे शहराच्या मंजुर विकास आराखडयानुसार मौजे ओवळे येथील स. नं. ९३ पै. या भूखंडावर पोलीस स्टेशन आ. क्र. १, क्षेत्र ४२००.०० चौ.मी. आहे. सदर आरक्षणाच्या एकुण क्षेत्रापैकी २७००.०० चौ.मी. क्षेत्र महापालिकेच्या ताब्यात आलेले आहे. तसेच सदर आरक्षणालगतच मौजे ओवळे येथील स. नं. ९२ पै., ९३ पै. या भूखंडावर पोस्ट ऑफीस आ. क्र. १, क्षेत्र ३२००.०० चौ. मी. आहे. सदर आरक्षणाच्या एकूण क्षेत्रापैकी २७६०.०० चौ. मी. क्षेत्र महापालिकेच्या ताब्यात आलेले आहे.

ज्या अर्थी, सेक्टर क्र. ६ मधील घोडबंदर रोडवरील कासारवडवली पोलीस स्टेशन हे घोडबंदर रोड सर्व्हिस रस्त्यामध्ये बाधित होत असल्याने, पोलीस विभागाने मागणी केल्यानुसार विकास प्रस्ताव क्र. ८८/४१५ अंतर्गत प्राप्त झालेल्या ३६४०.०० चौ. मी. क्षेत्राच्या सुविधा भूखंडावर कासारवडवली पोलीस स्टेशन इमारतीच्या बांधकामाचा प्रस्ताव मंजुर करण्यात आला आहे. त्यामुळे मौजे ओवळा येथील पोलीस स्टेशन आ.क्र.१ व पोस्ट ऑफीस आ. क्र. १ ऐवजी म्युनिसिपल पर्पज हे आरक्षण दर्शविण्यास तसेच सदरचे आरक्षण विकसित करण्याचे समुचित प्राधिकरण ठाणे महानगरपालिका असे करणेकरिता महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाचा प्रस्ताव प्रस्तावित करण्यात आला आहे. सदर फेरबदल प्रस्तावास ठाणे महानगरपालिकेच्या मा. सर्वसाधारण सभेने ठराव क्र. १७६०, दि.२२/१२/२०१७ अन्वये मान्यता दिलेली आहे.

आणि त्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ मधील तरतूदीनुसार "उक्त मंजुर विकास योजनेत उक्त फेरबदलाबाबत" आम जनतेच्या सुचना / हरकती मागविणेसाठी ही जाहिर सुचना प्रसिध्द करण्यात येत आहे. उक्त फेरबदल दर्शविणारा नकाशा सहायक संचालक नगर रचना, ठाणे महानगरपालिका, "महापालिका भवन", सरसेनानी जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग, चंदनवाडी, पाचपाखाडी, ठाणे यांचे कार्यालयीन सुचना फलकावर तसेच खाली नमूद संकेत स्थळावर ठेवण्यात आला आहे. उक्त फेरबदलाबाबत कोणत्याही व्यक्तीस सुचना / हरकती घ्यावयाची असल्यास त्यांनी हि सुचना वृत्तपत्रात व www.tmctp.thanecity.gov.in या संकेत स्थळावर आणि महाराष्ट्र शासनाचे राजपत्रात प्रसिध्द झाल्यापासुन ३० (तीस) दिवसांचे आत आपली सुचना / हरकत महापालिका आयुक्त, ठाणे महानगरपालिका आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांचेकडे सादर करावी.

(श्रीकांत मा. देशमुख)
सहायक संचालक नगर रचना,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.